**ठळक बातम्या**

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते ४ मान्यवरांना भारतरत्न प्रदान
- उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत संपल्यानंतर राज्यात पहिल्या टप्प्यातल्या ५ लोकसभा मतदारसंघांत ९७ उमेदवार रिंगणात
- शरद पवारांकडून लोकसभेसाठी ५ उमेदवारांची घोषणा, सुप्रिया सुळे, अमोल कोल्हे, निलेश लंके यांना उमेदवारी

आणि

- समुद्री चाच्यांच्या हल्ल्यातून भारतीय नौदलाकडून पाकिस्तानी बोटीची सुखरुप सुटका, हल्लेखोरांना भारतात आणणार

<><><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज राष्ट्रपती भवनात आयोजित समारंभात सर्वोच्च नागरी सन्मान भारतरत्न प्रदान केले. माजी प्रधानमंत्री पी व्ही नरसिंह राव यांच्या वतीने त्यांचे चिरंजीव पीव्ही प्रभाकर राव, चौधरी चरण सिंह यांच्या वतीने यांचे नातू जयंत सिंग, बिहारचे माजी मुख्यमंत्री कर्पूरी ठाकूर यांच्या वतीनं त्यांचे चिरंजीव रामनाथ ठाकूर यांनी पुरस्कार स्वीकारला. कृषी शास्त्रज्ञ एम. एस. स्वामिनाथन यांच्या वतीने त्यांच्या कन्या  नित्या राव यांनी भारतरत्न सन्मान स्वीकारला. माजी उपप्रधानमंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांना राष्ट्रपती, उद्या पुरस्कार प्रदान करतील. उपराष्ट्रपती जगदीप धनखड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर, बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार आणि इतर मान्यवर या समारंभाला उपस्थित होते.

<><><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी माजी प्रधानमंत्री पी व्ही नरसिंह राव, चौधरी चरणसिंग, प्रसिद्ध शास्त्रज्ञ एम एस स्वामिनाथन आणि बिहारचे माजी मुख्यमंत्री कर्पूरी ठाकूर यांच्या योगदानाचं कौतुक केलं आहे.

पी व्ही नरसिंह राव यांनी देशाच्या प्रगतीसाठी आणि आधुनिकीकरणासाठी मोठ्या प्रमाणावर काम केलं असल्याचं मोदी यांनी समाज माध्यमावर केलेल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे. तसंच चौधरी चरणसिंग यांच्या कठोर परिश्रम, समर्पण आणि लोकसेवेची मूल्ये जोपासण्यासाठी हा सन्मान भावी पिढ्यांना प्रेरणा देईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कृषी क्षेत्रातल्या एम.एस. स्वामिनाथन यांच्या योगदानाचा उल्लेख करून त्यांच्या प्रयत्नांमुळेच भारत अन्नधान्य उत्पादनात स्वावलंबी झाला असल्याचं मोदी यांनी म्हटलं. कर्पूरी ठाकूर यांनी मागासवर्गीयांच्या हक्कांसाठी केलेल्या अखंड संघर्षानं भारतीय समाजावर छाप उमटवली असल्याचं मोदी यांनी म्हटलं आहे.

<><><><><><>

उमेदवारी मागे घेण्याची मुदत संपल्यानंतर राज्यात पहिल्या टप्प्यातल्या ५ लोकसभा मतदारसंघांत १३ जणांनी माघार घेतल्यानं ९७ उमेदवार रिंगणात आहेत, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं दिली. रामटेकमध्ये २८, नागपूरमध्ये २६, भंडारा-गोंदियात २२, गडचिरोली-चिमूरमध्ये १२ आणि चंद्रपुरात १३ उमेदवार निवडणूक लढवणार आहेत. या तिन्ही मतदारसंघात राष्ट्रीय पातळीवर नोंदणीकृत असलेल्या पक्षांचे ३-३ उमेदवार आहे. काँग्रेस, भाजपा, शिवसेना आणि बहुजन समाज पक्षानं हे उमेदवार दिले आहेत.

राज्यातल्या मतदारांच्या संख्येत वाढ झाल्यानं मतदान केंद्रांची संख्या ४७४ ने वाढवून ९८ हजार ११४ मतदान झाली आहे. यातल्या १० हजार ६५२ मतदान

केंद्रांवर पहिल्या टप्प्यात मतदान होणार आहे. या ठिकाणच्या २३ हजार ३५६ मतदारांनी घरुन मतदान करण्याचा पर्याय निवडला आहे, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांनी दिली. टपालाद्वारे ९ हजार ४१६ जण मतदान करणार आहेत. अंध मतदारांसाठी निवडणूक आयोगानं ब्रेलमध्ये मतदानाची माहिती देण्याची सोय उपलब्ध केली आहे. राज्यात सध्या १ लाख १६ हजार ५१८ अंध मतदार आहेत.

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी राज्यातल्या २६ हजार ६८५ जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई गुरुवारपर्यंत झाली आहे. २७ हजारांहून अधिक शस्त्र जमा झाली असून १९० शस्त्र जप्त केली आहेत. परवाना नसलेली ५५७ शस्त्रही जमा केलेली आहे.

आतापर्यंत ३३ कोटी १२ लाख रुपयांची रोख रक्कम राज्यात जमा झाली असून १९ कोटी ३४ लाख रुपयांचं मद्य निवडणूक यंत्रणांनी जप्त केलं आहे. याशिवाय १८६ कोटींचे अमलीपदार्थ, ४० कोटी २३ लाख रुपयांचे मौल्यवान धातू आणि ६३ कोटी १७ लाख रुपयांच्या इतर वस्तू आयोगानं जप्त केल्या आहेत. यासाठी पावणे ४ हजार पथकं राज्यभरात कार्यरत आहेत.

**<><><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं लोकसभा निवडणुकांसाठी पाच उमेदवारांची पहिली यादी आज जाहीर केली. बारामती मतदारसंघातून सुप्रिया सुळे, शिरूर लोकसभा मतदारसंघातून अमोल कोल्हे यांना उमेदवारी घोषित करण्यात आली आहे. याशिवाय, अहमदनगरमधुन निलेश लंके, वर्धा इथून अमर काळे आणि दिंडोरी मतदारसंघातून भास्कर भगरे यांना उमेदवारी देण्यात आल्याची घोषणा प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आज मुंबईत एका पत्रकार परिषदेत केली.

गेल्यावेळी नगरमधून संग्राम जगताप, दिंडोरीतून धनराज महाले आणि वर्ध्यातून काँग्रेसच्या चारुलता टोकस यांनी निवडणूक लढवली होती.

महाविकास आघाडीत जागावाटपाची चर्चा अंतिम टप्प्यात असून उर्वरित उमेदवारांची घोषणा करण्यात येणार असल्याचंही जयंत पाटील यांनी सांगितलं.

**<><><><><><>**

राष्ट्रीय समाज पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष महादेव जानकर परभणीतून महायुतीचे उमेदवार असतील. सोमवारी ते परभणीतून अर्ज भरणार असून यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार उपस्थित असतील, असा दावा त्यांनी आज वार्ताहरांशी बोलताना केला. महाविकास आघाडीतल्या शरद पवार वगळता इतर पक्षांनी प्रतिसाद दिला नाही. त्यामुळं महायुतीमध्ये असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><><>**

राज्याचे मुख्य सचिव नितीन करीर यांना केंद्र सरकारनं ३ महिन्यांची मुदतवाढ दिली आहे. सेवानिवृत्तीचं वयोमान पूर्ण केल्यानं ते उद्या निवृत्त होणार होते. मात्र ते आता ३० जूनपर्यंत पदावर राहू शकतील.

**<><><><><><>**

पश्चिम बंगाल मध्ये ईडी अर्थात सक्तवसुली संचालनालय शेख शाहजहानची बसीरहाट तुरुंगात चौकशी झाली. शेख शहाजहानला सीबीआयने अटक केली होती. स्थानिक लोकांच्या जमिनी हिसकावून त्या जमिनींवर तलाव बनवणं आणि तलावांमध्ये मत्स्यपालन करण्यामध्ये शाहजहानच्या भूमिकेची ईडी चौकशी करत आहे.

**<><><><><><>**

समुद्री चाच्यांना ताब्यात घेतल्यानंतर भारतीय नौदलाच्या तज्ञ पथकानं अल कानबार या जहाजाची तपासणी पूर्ण केली आहे. मासेमारी पुन्हा सुरू करण्यासाठी २३ पाकिस्तानी नागरिकांची वैद्यकीय तपासणी झाली. २०२२ च्या सागरी चाचेगिरी विरोधी कायद्यानुसार पुढील कायदेशीर कारवाईसाठी नऊ समुद्री चाच्यांना भारतात आणलं जाणार आहे.

**<><><><><>**

चांगल्या नोकरीच्या अमिषाला बळी पडून कंबोडिया मध्ये गेलेल्या आणि सायबरशी निगडित  बेकायदेशीर कामं करणं भाग पडत असलेल्या भारतीय नागरिकांच्या तक्रारींना  तिथलं भारतीय दूतावास तात्काळ प्रतिसाद देत असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी सांगितलं. केंद्र सरकार कंबोडियाच्या प्राधिकरणाच्या संपर्कात असल्याचं तसंच संबंधित भारतीय नागरिकांची सुटका करण्याचं काम सुरु असल्याचं जयस्वाल यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज लखनौ सुपर जायंट संघानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. लखनौच्या अटलबिहारी वाजपेयी मैदानावर संध्याकाळी साडेसात वाजता पंजाब किंग्ज् विरोधातला हा सामना सुरू झाला. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा लखनौ सुपर जायंट संघाच्या ८ षटकात २ बाद ६५ धावा झाल्या.

**<><><><><>**

माद्रिद स्पेन मास्टर्स सुपर ३०० बॅडमिंटन स्पर्धेत, मिश्र दुहेरीच्या उपांत्य फेरीत भारतीय संघ पराभूत झाला. एन. सिक्की रेड्डी आणि बी.  सुमित रेड्डी या जोडीचा आज इंडोनेशियाच्या रिनोव्ह रिवाल्डी आणि पिथा एच. मेंतारी या जोडीने १७-२१ १२-२१ असा पराभव केला.

याआधी उपांत्यपूर्व फेरीत या भारतीय जोडीने इंडोनेशियाच्या चौथ्या मानांकित रेहान नौफल कुशारजांतो आणि लिसा आयु कुसुमावती यांच्यावर १४-२१, २१-११, २१-१७ असा विजय मिळवला होता.

<><><><><><>

यंदाच्या लोकसभा निवडणुकीत मतदानाचं प्रमाण ७५ टक्क्यांपर्यंत वाढवण्याचं उद्दिष्ट निवडणूक आयोगानं ठेवलं आहे. त्यासाठी थेट मतदान केंद्रांच्या पातळीवर जाऊन आढावा घेण्याचे  प्रयत्न सुरू आहेत, अशी माहिती राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांनी आकाशवाणीला विशेष मुलाखतीमधे दिली आहे.

श्रोते हो, या मुलाखतीचा दुसरा भाग उद्या संध्याकाळी सव्वा सात वाजता वृत्तविशेष या कार्यक्रमात आपल्याला ऐकता येईल. आकाशवाणीच्या समाज माध्यम खात्यांवर, Mumbai AIR News युट्युब चॅनेलवर आणि आकाशवाणी मराठी बातम्या या पॉडकास्टवर देखील  हा कार्यक्रम उपलब्ध आहे.

<><><><><><>

श्रोतेहो, राज्यातल्या लोकसभा निवडणुकीतल्या परिस्थितीचा आढावा घेणारा ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ हा कार्यक्रम आकाशवाणी आपल्यासाठी घेऊन येत आहे सोमवार १ एप्रिलपासून. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेदरम्यान आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर हा कार्यक्रम आपल्याला ऐकता येईल. आकाशवाणी मराठी बातम्या या पॉडकास्ट चॅनेलसह आकाशवाणीच्या विविध प्रादेशिक वृत्तविभागांच्या सोशल मीडिया आणि युट्युबवरही हा कार्यक्रम ऐकता येईल.

//<><><><><><>//